महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वाी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/मावक/न.क्र.३७/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४००- ०१९
email : managerbcr@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ४९५ दिनांक ३१ / ०७ / २०१४

विषय : शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागासप्रवर्ग (इ.एस.बी.सी.) आणि विशेष मागास प्रवर्ग-अ (एस.बी.सी.-ए) करिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिदु नामावली विहित करणेबाबत.

संदर्भ : १) शासन निर्णय क्र.सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र.३५/मावक दि.१५/०७/२०१४.
२) शासन निर्णय क्र.अविवि-२०१४/प्र.क्र.८१/का-७, दि.१९/०७/२०१४.
३) शासन निर्णय क्र.बी.सी.सी./२०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३/१६-ब, दि.२४/०७/२०१४.
४) शासन निर्णय क्र.बी.सी.सी./२०१४/प्र.क्र.२१६-ए/२०१४/१६-ब, दि.२४/०७/२०१४.

.......

राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग वगळून राज्यात शैक्षणिक व सामाजिक मागासलेपणाच्या कारणावरून, शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास (इ.एस.बी.सी.) प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग-अ (इ.एस.बी.सी.-ए) असे नवीन प्रवर्ग तयार करून त्यांना शासकीय/निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीकरिता व शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशाकरिता आरक्षण देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. आता या संदर्भात शासनाने सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.XIII व XIV दि.९ जुलै २०१४ अन्वये शैक्षणिक_आणि सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग (इ.एस.बी.सी.) व विशेष मागास प्रवर्ग-अ (एस.बी.सी.ए.) निर्माण करण्यात आले आहेत. सदर अध्यादेशानुसार (राज्यातील शैक्षणिक संस्थामधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्तींचे किंवा पदांचे) शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास (इ.एस.बी.सी.) प्रवर्गाकरिता १६ % व विशेष मागास प्रवर्ग-अ (एस.बी.सी.-ए) प्रवर्गाकरिता ५ % आरक्षण विहित करण्यात आले आहे.

३. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बी.सी.सी./२०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३/१६-ब, दि.२४/०७/२०१४ व शासन निर्णय क्र.बी.सी.सी./२०१४/प्र.क्र.२१६-ए/२०१४/१६-ब, दि.२४/०७/२०१४ अन्वये शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग (इ.एस.बी.सी.) व विशेष मागास प्रवर्ग-अ (एस.बी.सी.-ए) करिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार बिंदु नामावली विहित करण्यात आलेली आहे.

४. या अनुषंगाने सर्व संबंधीत नियुक्ती अधिकाऱ्यांना सूचित करण्यात येते की, संदर्भिय शासन निर्णयांचे अवलोकन करून सदरील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे. सोबत संदर्भिय शासन निर्णयांच्या प्रती जोडण्यात आलेल्या आहेत.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या आर-अेपीडीआरपी पोर्टल वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

३१/७

( संदेश हाके )
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**